माहितीचा अधिकार

# राज्य माहिती आयोग,अमरावती खंडपीठ

## व्दितीय अपील क्रमांक १३४७/२०१८

गोपाल चरणदास राठोड,
रा. धामणदरी, पो. लोहगड,
ता. बार्शीटाकळी, जि. अकोला

**अर्जदार**

विरुध्द

जन माहिती अधिकारी तथा
वनपरिक्षेत्र अधिकारी अकोला (.प्रा),
जि. अकोला

**उत्तरवादी**

प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (वने), अकोला वनविभाग,
अकोला, जि .अकोला

| **उपस्थिती**: सुनावणी दिनांक **१२.०५.२०२२** | व्यक्तीशः/ प्रतिनिधी | नांव |
|---|---|---|
| अर्जदार | व्यक्तीशः | गोपाल चरणदास राठोड |
| ज.मा.अ. | व्यक्तीशः | आर.एन.ओवे |
| प्र.अ.अ. | प्रतिनिधी | डी.डी.मदने (प्रतिनिधी पत्र अप्राप्त) |

लघुरुपेः जन माहिती अधिकारी करिता ज.मा.अ. तथा प्रथम अपिलीय अधिकारी करिता प्र.अ.अ.

राज्य माहिती आयुक्तः डॉ. विनय कुमार सिन्हा

दिनांकः १२ मे २०२२

## आदेश

१. अर्जदार यांनी माहितीकरिता त्याचे अर्जावर जन माहिती अधिका-याकडून समाधानकारक प्रतिसाद मिळत नसल्याचे कळवून माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९(३) खाली दाखल केले द्वितीय अपिलावर आयोगानी चौकशी व सुनावणी करण्याचे ठरविले.

| | |
|---|---|
| माहितीचा अर्ज /दाखल दिनांकः | १२.०३.२०१८ |
| ज.मा.अ. यांचे उत्तराचा दिनांकः | - |
| प्रथम अपिल अर्ज/ दाखल दिनांकः | १२.०४.२०१८ |
| प्र.अ.अ. यांचा आदेशाचा दिनांकः | २७.०४.२०१८ |
| द्वितीय अपिल अर्ज/ दाखल दिनांकः | १८.०५.२०१८ |
| प्र.अ.अ. यांचा आदेशापासून दिवसः | २१ ; द्वितीय अपिल विहित वेळेत सादर केले |
| सुनावणी सूचना (नोटिस) दिनांकः | २९.०४.२०२२ |

२. अर्जदार यांनी मागितलेली माहितीचे वर्णन (जोडपत्र अ):

माहितीचा विषयः १. कुटासा बिट (नियत क्षेत्र) चा नकाशाची सत्यप्रत
२.बिटबुकाची सत्यप्रत
३.अकोला रेजमये आतापर्यंत २०१४ ते माहिती देण्याच्या तारखेपर्यंत किती वन्यजिव प्राणी मृत्यु झाले व बचावले त्यांचे नोंदलेल्या पंचनाम्याची सत्यप्रत
४.२०१४ ते माहिती देण्याच्या तारखेपर्यत मृत्यु झालेल्या वन्यजिव प्राणीच्या प्यूआर (PUR) फाडले व गून्हा नोंदविले त्याची सत्यप्रत व त्याची पोस्टमार्टम रिपोर्ट (PM) ची सत्यप्रत

३. प्र.अ.अ. यांनी प्रथम अपिलावर आदेश पारीत केले:

"जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रा.) अकोला यांनी अपिलार्थीनी मागणी केलेली माहिती नुसार त्यांचेकडे उपलब्ध असलेली माहिती दिनांक ०५.०५.२०१८ रोजी व्यक्तीशः विनामुल्य उपलब्ध करुन देण्याचे आदेश देण्यात येत आहे. अर्जदार यांचे अपिल १९(१) अंतर्गत निकाली काढण्यात येत आहे."

४. अर्जदार यांनी व्दितीय अपिल दाखल करण्याचे प्रयोजन पुढील प्रमाणे दिले आहे:

" मा.ज.मा.अ. तथा वनपरिक्षेत्र अधिकारी अकोला यांना मा.प्र.अ.अ. सहायक वनसंरक्षक अकोला यांनी आदेश देवून सुध्दा माहिती पुर्ण दिली नाही."

## सुनावणी सूचना (नोटिस) वर लेखी निवेदन व सुनावणी

५. वर नमुद सूचनेद्वारे सर्व संबंधितांना व्दितीय अपिल अर्जाबाबत त्यांचे म्हणणे लेखी सादर करण्यास संधी देवून सुनावणीचा दिवस कळविण्यात आला. ज.मा.अ.यांनी त्यांचे लेखी निवेदन सादर केले आहे. तसेच अर्जदाराने माहितीबाबत प्रपत्र सादर केले असून आदेश पारित होवून सुध्दा माहिती न दिल्याचे नमुद केले आहे.